मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
जिल्हा अंमलबजावणी कक्ष
आरडीजी कॉलेज समोर पिंडिकेव्ही रोड, अकोला akola.diu.smart@gmail.com

जा.क्र./स्मार्ट/ लेखापरीक्षण/ 384/2024
प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट
तथा प्रकल्प संचालक, आत्मा, अकोला
दिनांक :- 6 / 12/2024

प्रति,
एस. रामानंद अय्यर,
लेखापरिक्षक

विषय :- लेखापरीक्षण आक्षेपाची (Audit Para) पुर्तता करणे बाबत.
संदर्भ :- 1) या कार्यालयाचा भाडेतत्वावर वाहन पुरविणे करीता महालक्ष्मी टॅक्सी सेंटर, मोठी उमरी, अकोला यांना दिलेला कार्यारंभ आदेश जा.क्र. 189 दि.19/06/2023
2) या कार्यालयास लेक्षापरीक्षण आक्षेप बाबतचा प्राप्त मेल दि. 04/12/2024

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, जागतिक बँक अर्थसहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन प्रकल्प (SMART) अंतर्गत संदर्भ क्र. 1 नुसार भाडेतत्वावर वाहन पुरविणे करीता महालक्ष्मी टॅक्सी सेंटर, मोठी उमरी, अकोला यांना दि. 19/06/2023 ते दि.18/06/2024 एक वर्ष पर्यत मुदतीचा कार्यारंभ आदेश हा निर्गमित करण्यात आला होता. सदर सेवापुरवठादार यांचे कडुन 500 रु. चे मुद्रांकावर करारनामा करणे क्रमप्राप्त होते.

या कार्यालया मार्फत सेवा पुरवठादार महालक्ष्मी टॅक्सी सेंटर, मोठी उमरी, अकोला यांचे कडुन करारनामा हा घेण्यात आलेला नाही. मात्र कळविण्यात येत की, या कार्यालयास उक्त मुदतीमध्ये सेवापुरवठादार यांच्या कडुन पुरविण्यात आलेल्या सेवा हया नमुद असलेल्या वाहनाच्या RFQ नुसार प्राप्त झाल्या असुन त्यामध्ये कुठल्याही प्रकारची तक्रार राहीलेली नाही.

तरी त्याबद्दल क्षमस्व असुन यापुढे याबाबतची दक्षता घेण्यात येईल. तरी संदर्भिय वाहन पुरवठादार यांचे कडुन 500 रु. चे मुद्रांकावर करारनामा बाबतचा लेखापरीक्षण आक्षेप पुर्तता करण्यात येत आहे.

(मोहिनी जाधव)
नोडल अधिकारी
जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, अकोला

प्रत :- 1) मा. प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्मार्ट, पुणे यांना माहीतीस्तव सविनय सादर.
2) मा. नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, पुणे यांना माहीतीस्तव सविनय सादर.
3) मा.नोडल अधिकारी, विभागीय अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, अमरावती यांना माहीतीस्तव सविनय सादर.

-स्वा-
(मोहिनी जाधव)
नोडल अधिकारी
जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, अकोला

Scanned with ACE Scanner